# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 11.09.2026** **वार : शुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

1. एमपीएससी परीक्षेतील गैरव्यवहारांची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करणार; मुख्यमंत्र्यांची ग्वाही.
2. वाशीमध्ये आयोजित पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळेत राज्यानं नोंदवला जागतिक विक्रम.
3. राज्यात दोन वेगवेगळ्या अपघातात 12 जणांचा मृत्यू.
4. महिलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताची अंतिम फेरीत धडक.
5. राज्यात आतापर्यंत सरासरीच्या 82 टक्के पाऊस, येत्या काही दिवसात काही भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता.

**सविस्तर बातम्या**

**परीक्षा घोटाळा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या 2025च्या 'ब' आणि 'क' गटाच्या पूर्व आणि मुख्य परीक्षेतल्या घोटाळ्याची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी काल मुंबईत आंदोलक परीक्षार्थींशी चर्चा करताना ही घोषणा केली.

या परीक्षांच्या गुणपत्रिकांची पुनर्तपासणी करण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं. याशिवाय अभियांत्रिकी सेवा, कृषीसेवा, अन्न सुरक्षा अधिकार या परीक्षांच्या उत्तर पत्रिकांची पुनर्तपासणी करण्याचे निर्देश MPSC ला देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**जागतिक विक्रम**

गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीनं साजरा करणं, ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते काल वाशी मध्ये आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळेत ते बोलत होते. या भव्य कार्यशाळेत एकाच वेळी 10 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये महाराष्ट्राच्या नावे जागतिक विक्रम नोंदवला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले...

***"माझी तर विनंती आहे. आता तुम्हाला मातीची मूर्ती बनवायला येतेय, पुढच्या वर्षीपासून आपल्या घरच्या लोकांना सांगा, आम्ही बनवलेली मूर्तीचीच प्रतिष्ठापना करा आणि 10 दिवसांनी आपल्याच मूर्तीचं विसर्जन करा. तुम्ही विचार करा किती आनंद येईल."***

जागतिक विक्रम ठरलेल्या या उपक्रमाच्या यशाचे खरे शिलेदार सहभागी विद्यार्थी असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांचं कौतुक केलं. या कार्यशाळेत फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनीदेखील स्वतःच्या हाताने शाडू मातीची गणेशमूर्ती साकारली.

**पदवीदान**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या या युगात केवळ पदवी मिळवणं पुरेसं नसून विद्यार्थ्यांनी ‘आजीवन विद्यार्थी’ राहून सातत्यानं नवी कौशल्ये आत्मसात करावीत, असं प्रतिपादन राज्यपाल आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा

यांनी काल केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 127 व्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्यासह विद्यापीठाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या सोहळ्यात 6 सुवर्णपदकं, 446 पी.एच.डी, तसंच 1 लाखांहून अधिक पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

**बैल पोळा**

आपल्या कृषीप्रधान संस्कृतीत महत्त्वाचा मानला जाणारा बैलपोळ्याचा सण काल राज्यात, विशेषतः ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीनं साजरा करण्यात आला. श्रावण अमावस्येला साजऱ्या केल्या जाणाऱ्या पोळ्याच्या दिवशी शेतकरी आपल्या सर्जा-राजाच्या जोडीला सजवून, गोडाचा नैवेद्य दाखवून, त्यांची वाजत-गाजत मिरवणूक काढून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. बुलढाणा आणि हिंगोली जिल्ह्यात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने दुष्काळाचे सावट असतानाही हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी काल शेतकऱ्यांबरोबर पोळा सण साजरा केला.

परभणी जिल्ह्यातही बैलपोळ्याच्या सणावर यंदा अपुऱ्या पावसाचं सावट होतं, या सणाच्या निमित्तानं परभणी जिल्ह्यातल्या पीकपाण्याच्या सध्याच्या स्थितीबाबत आमच्या प्रतिनिधीनं दिलेली माहिती...

***"परभणी जिल्ह्यात यंदा दुष्काळाचे सावट असतानाही आपल्या शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैल पोळा सन, यावर्षी अंत्यंत साधेपनाने साजरा करण्यात आला. या वर्षी बैलांना आकर्षक सजावट, रंग रंगोटी, साज यावर खर्च कमी करावा लागला.***

***यावर्षी सरासरीच्या 50 टक्के पेक्षा कमी पाऊस झाला असून ऑगस्ट महिना पूर्ण कोरडा गेल्यामुळे खरिपाच्या सोयाबीन, कापूस, हळद पिकांना पोषक असा पाऊस न झाल्याने पिके करपूर जात आहेत. याशिवाय सोयाबीनवर रस शोषक किडीचा प्रादुर्भाव आणि हळदीला हुमानी, कांदकुज तर ऊस आणि कापसावर पांढरी माशीमुळे पिके धोक्यात आली आहेत. येणाऱ्या काळात पाण्याची आणि चाऱ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने वेळीच उपाययोजना करण्याची गरज आहे. बैल केवळ जनावरे नसून ते कुटुंबातील सदस्य असतात त्यामुळे दुष्काळ असो किंवा इतर संकेत असो बैल आमची साथ देतात, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. आकाशवाणी बातम्यांसाठी सुदर्शन चापके, परभणी."***

भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी बैलांच्या शिंगांवर आणि पाठीवर लावलेल्या बॅनरच्या माध्यमातून आपला बोनस तात्काळ द्यावा, अशी मागणी केली. बैलांची जागा आता ट्रॅक्टरने घेतली असल्यानं बुलडाणा जिल्ह्यात मेहकर इथं ट्रॅक्टर पोळा साजरा करण्यात आला. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव ट्रॅक्टर चालवत यात सहभागी झाले.

यवतमाळच्या पोस्टल मैदानावर नगरपरिषदेनं बैलपोळा भरवला होता. सहभागी नागरिकांनी पारंपारिक खेळ खेळत झडत्या म्हटल्या. उत्कृष्ट बैलजोड्यांना बक्षिसं देण्यात आली.

तान्हा पोळ्यानिमित्त आज नागपुरात मारबत उत्सव साजरा करण्यात येणार आहे. प्रथेनुसार शहरात काळी मारबत, पिवळी मारबत आणि बडग्याची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे

**केवायडी**

राज्यातल्या नोंदणीकृत डॉक्टरांना आता आपल्या वैद्यकीय व्यावसायाच्या जागी केवायडी अर्थात नो युवर डॉक्टर या माहितीची अधिकृत क्यू आर कोड प्लेट लावणं बंधनकारक झालं आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने काल ही अधिसूचना जारी केली. वैद्यकीय परिषदेनं उपलब्ध करुन दिलेली केवायडी प्लेट डॉक्टरांनी येत्या 31 ऑक्टोबरपर्यंत लावणं आवश्यक असल्याचं परिषदेनं म्हटलं आहे.

**गुंतवणूक-परिषद**

नंदुरबार इथं झालेल्या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत 123 उद्योजकांनी 5 हजार 3 कोटींचे सामंजस्य करार केले. यातून जिल्ह्यात 7 हजार 778 रोजगार निर्मिती होणार असल्याची माहीती राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. जिल्ह्यात उद्योगांची उभारणी करताना स्थानिक नागरिकांना प्राधान्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**स्नेहल तोडकर**

मानसिक आरोग्याच्या समस्येतून जात असताना मदत मागणं म्हणजे कोणताही कमीपणा नसून, ते धैर्याचं एक पाऊल आहे,' असं प्रतिपादन मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टर स्नेहल तोडकर यांनी केलं. जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त रत्नागिरीच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष जनजागृतीपर कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

**अपघात**

नांदेड जिल्ह्यातल्या भोकरजवळील सीताखंडी घाटात काल संध्याकाळी झालेल्या अपघातात 8 प्रवासी ठार झाले तर 4 जण गंभीर जखमी झाले आहेत. भरधाव वेगानं जाणाऱ्या एका ट्रकने पिकअप वाहनाला धडक दिल्यानं हा अपघात घडला.

अहिल्यानगर ते कल्याण दरम्यान भाळवणी जवळ एक टेम्पो आणि मोटर यांच्यात झालेल्या दुसऱ्या अपघातात एकाच कुटुंबातील चौघांचा जागीच मृत्यू झाला.

**निधन**

सातारा जिल्ह्यातील वाई इथले ज्येष्ठ पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते मधुसूदन नेने यांचं काल वाई इथं अल्पशा आजाराने निधन झाले. ते 74 वर्षांचे होते. वाई शहरासह सातारा जिल्ह्यातील अनेक धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक संस्थांच्या कार्याशी त्यांचा दीर्घकाळ निकटचा संबंध होता. सज्जनगड इथल्या श्री समर्थ सेवा मंडळाच्या सज्जनगड मासिक पत्रिकेचे गेली 18 वर्षे ते कार्यकारी संपादक म्हणून कार्यरत होते.

**महिला क्रिकेट**

दुबईत काल रात्री झालेल्या महिला आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात, भारतानं बांगलादेशचा 40 धावांनी पराभव केला. या विजयामुळे भारताचं अंतिम सामन्यातलं स्थान निश्चित झालं आहे. भारताच्या दीडशे धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना, बांगलादेशला निर्धारित 20 षटकांत 7 गडी गमावून केवळ 109 धावा करता आल्या. 40 चेंडूत 64 धावांची खेळी करणारी भारताची शफाली वर्मा 'सामनावीर' ठरली. दूसरा उपांत्य सामना आज श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यात होणार आहे.

**पाऊसमान**

यंदाच्या मान्सूनमध्ये राज्यात पावसाचे प्रमाण असमान राहिले असून, जूनपासून राज्यात सरासरीच्या तुलनेत सुमारे 82 टक्के पाऊस झाला आहे. कोकण विभागात पावसाची स्थिती तुलनेने समाधानकारक आहे; मात्र मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पावसाची तूट कायम आहे. पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर विभागात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी आहे. त्यामुळे काही भागांत शेती आणि पाणी उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**हवामान**

पुढील काही दिवसांत राज्याच्या काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता असून, काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.